# जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड

| | |
|---|---|
| वेब साईटः- www.nanded.gov.in | ई-मेलः- laoconanded@gmailcom |
| दुरध्वनी क्रं.ः- 02462-244651 | फॅक्स क्रं. ः- 02462-238500 |
| शाखाः- भुसंपादन(समन्वय) | क्रमांक 2017/आरबी/डेस्क-3/भुसं/काप |


दिनांकः-19/12/2017

78969
22/12/2017

प्रति,
उपविभागीय अधिकारी, कंधार

विषयः- भूसंपादन प्रस्ताव – कदमाचीवाडी साठवण तलावासाठी मौजे कदमाचीवाडी ता. लोहा जि. नांदेड येथील कलम 19 च्या अधिसुचनेस 12 महिन्याची मुद्दतवाढ देणे बाबत.

संदर्भः- आपले पत्र क्रं. 2017/उविअ/भुसं/सिआर- दि 11.12.2017

---

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये भूसंपादन कायदा भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 नुसार भुसंपादन प्रकरणांत कलम 19 ची अधिसुचना प्रसिध्द झाल्यापासुन बारा महिन्याच्या आत कलम 23 अन्वये निवाडा होणे आवश्यक आहे. परंतु उक्त प्रकरणांत मोजणी अहवाल अप्राप्त असल्यामुळे प्रकरणांत निवाडयाची कार्यवाही करता आलेली नाही. करिता प्रकरणांत समुचित शासनास 12 महिन्याचा कालावधी मिळणे बाबत विनंती केली आहे.

प्रस्तुत प्रकरणी संचिकेची तपासणी केली असता, प्रस्तुत प्रकरण हे व्यपगत होवु नये व प्रकरणी निवाडयाबाबची पुढील कार्यवाही होण्यासाठी प्रकरणांत 12 महिन्याचा कालावधी वाढवुन देण्यात येत आहे. व संपादक संस्थेकडुन निधी उपलब्ध करुन घेवुन निवाडयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही तात्काळ करावी. सदरील प्रस्तावास मंजुरीची हरकत नसुन प्रस्तुत प्रकरण व्यपगत होण्यास जबाबदारी निश्चित करुन या कार्यालयास अवगत करावे. प्रकरणांत देण्यात आलेली मुद्दतवाढ संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यात यावी.

मा. जिल्हाधिकारी यांचे टिपणी मान्यतेने

जिल्हाधिकारी नांदेड करिता

**प्रतिलिपीः**-कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग नांदेड यांना देवुन कळविण्यात येत की, विषयांकित प्रकरणांतील निधी संबंधित भुसंपादन अधिकारी यांचेकडे तात्काळ उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी. जेणे करुन प्रकरणांत पुढील कार्यवाही करणे सुलभ होईल. अन्यथा आपले कार्यालयाच्या विलंबामुळे निधी अभावी प्रस्तुत प्रकरणांचा प्रस्ताव रद्द करण्यात येईल. याची दक्षता घ्यावी.

सही/-
जिल्हाधिकारी नांदेड करिता

26/12/2017